**मुख्य कार्यालय, विरार**

**विरार (प),**

**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**

**फॅक्स : 0250-2525107**

**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**


**जावक क्र. : व.वि.श.म./ /**

दि.०८/०४/२०२६

**दि.०८/०४/२०२६**

## मा.उप-महापौर श्री.मार्शल लोपीस यांची नालासोपारा पूर्व येथील माता बाल संगोपन केंद्रास भेट; जनतेच्या सेवेसाठी आणखी एक ठोस पाऊल

मा.उप-महापौर श्री.मार्शल लोपीस यांनी महानगरपालिकेचे माता बाल संगोपन केंद्र, सर्वोदय वसाहत, टाकी रोड, नालासोपारा पूर्व येथे भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी तेथे उपचार घेत असलेल्या मातांशी प्रत्यक्ष संवाद साधत त्यांची आत्मीयतेने विचारपूस केली. त्यांच्या अडचणी समजून घेत, संवेदनशीलतेने परिस्थितीचा आढावा घेतला.

भेटीदरम्यान केंद्रात आढळून आलेल्या पार्किंगची समस्या, स्वच्छतेची समस्या, औषधांची संबंधित अडचणी इ.बाबींवर तात्काळ आणि प्रभावी कार्यवाही करण्यासाठी संबंधित अधिकारी वर्गाला स्पष्ट आणि कडक शब्दात सूचना देण्यात आल्या. त्याचप्रमाणे माता बाल संगोपन केंद्राकडे जाणारा रस्ता हा अरुंद असल्यामुळे तेथे रुग्णवाहिका व इतर वाहने व्यवस्थितरित्या जातील याकरिता योग्य रस्ता तयार करून देणे बाबत मा.उप-महापौर महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

जनतेच्या आरोग्याशी संबंधित कोणत्याही समस्येकडे दुर्लक्ष न करता, त्वरित उपाययोजना करण्याचा ठाम निर्धार यावेळी दिसून आला.

या प्रसंगी उप-महापौर श्री.मार्शल लोपीस यांच्या समवेत नगरसेवक श्री.सचिन देसाई ही उपस्थित होते.